06:19 Vo) LTE1 5G 51%
Sakal ePaper: Marath...
epaper.esakal.com

## गो. से. हायस्कूलमध्ये व्यसनमुक्ती संकल्प

**पाचोरा :** येथील 'पीटीसी' संस्थेच्या गो. से. हायस्कूलमधील स्काउट-गाइड पथकाने 'एक दिवस- एक तास स्वच्छता' व महात्मा गांधी जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान राबविले. यानिमित्त स्काउट-गाइड पथकातील विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तिचा संकल्प करून शपथ घेतली. हायस्कूलच्या प्रांगणात स्वच्छता अभियानाचा संकल्प करून सुमारे ५० स्काउट-गाइड स्वयंसेवकांनी श्रमदान करून परिसराची स्वच्छता केली. मुख्याध्यापिका प्रमिला वाघ, एन. आर. पाटील, आर. एल. पाटील, अंजली गोहिल, स्काऊट शिक्षक आर. बी. कोळी, उज्वल पाटील, गाईड शिक्षिका एस. सी. पाटील, श्रद्धा पवार आदींनी हे अभियान राबविले.




**गिरड (ता. भडगाव) : जवाहर हायस्कूलमध्ये जयश्री कापुरे यांचा सत्कार करताना डी. डी. भोसले. शेजारी यू. वाय. पाटील, रमेश धनगर आदी.**

## गिरड येथे सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन

**गिरड (ता. भडगाव) :** येथील जवाहर हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र सायबर सेल पोलिस व क्वीकहिल फाउंडेशन- पुणे यांच्या विद्यमाने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावतर्फे संगणकशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. प्रा. यू. वाय. पाटील अध्यक्षस्थानी होते. आशिष पाटील व जयश्री कापुरे यांनी इंटरनेटचा सुरक्षित वापर कसा करावा, ऑनलाइन होणारे गुन्हे आणि त्यापासून कशी काळजी घ्यावी याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेबाबत जागरूक होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा. यू. वाय. पाटील यांनी केले. रमेश धनगर यांनी सूत्रसंचलन केले. डी. डी. भोसले यांनी आभार मानले. यशस्वितेसाठी कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

## औद्योगिक संस्थेतर्फे स्वच्छता अभियान

**अमळनेर :** महात्मा गांधी जयंती व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमित्त शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतर्फे गड, किल्ले व ऐतिहासिक स्थळे स्वच्छता मोहिमेंतर्गत अंबरीश टेकडीवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यात टेकडीवरील मंदिराचा परिसर स्वच्छ करण्यात आला. स्वच्छता हीच सेवा अंतर्गत स्वच्छता पंधरवाडा राबवण्यात आला. पिंपळे रस्त्यातील लामा जीन